## निशाणी क्र.५ वरील आदेश.

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीविरूध्द मौजे मस्सा (खं), ता. कळंब येथिल ग्रामपंचायत हदद्ीतील ग्रामपंचायत घर क्र. ६४६, पुर्व—पश्चिम : ३० फूट व दक्षिण—उत्तर : १६ १/२ फूट, ज्याची चतु:सिमा :— पुर्वेस — जवाहर भानुदास माळी यांची जागा, पश्चिमेस — बार्शी—कळंब जाणारा रस्ता, दक्षिणेस — शारदाबाई माळी यांची जागा व उत्तरेस — जवाहर भानुदास माळी यांची जागा यातील घ रजागेच्या वादीच्या मालकीने असलेल्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादीने हरकत निर्माण करू नये, असा दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जात असे कथन आहे की, मौजे मस्सा (खं), ता. कळंब येथिल ग्रामपंचायत हदद्ीतील ग्रामपंचायत घर क्र. ६४६, पुर्व—पश्चिम : ३० फूट व दक्षिण—उत्तर : १६ १/२ फूट, ज्याची चतु:सिमा :— पुर्वेस — जवाहर भानुदास माळी यांची जागा, पश्चिमेस — बार्शी—कळंब जाणारा रस्ता, दक्षिणेस — शारदाबाई माळी यांची जागा व उत्तरेस — जवाहर भानुदास माळी यांची जागा यातील घर जागा हा दाव्याचा विषय आहे. (सदर मिळतकतीस यापुढे 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येते)

३. अर्जात पुढे कथन असे की, दावा मिळकत ही मौजे मस्सा (खं), ता. कळंब येथिल जमिन गट क्र. ३१४, क्षेत्र ०० हे. ५९ आर मधील क्षेत्रापैकी आहे. सदर जमिन गट क्र. ३१४ ही वादीच्या व वादीचा चुलत भाऊ जवाहर भानुदास माळी यांची वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची होती. सदर जमिन गट क्र. ३१४ मधील पुर्व—पश्चिम : ३० फूट व दक्षिण—उत्तर : १६ १/२ फूट ही घरजागा वादीच्या वाटणीस येवून गेल्या २१ वर्षापासून वादीचा त्यावर ताबा आहे. सदर दावा मिळकतीबाबत वादी व वादीचा चुलत भाऊ जवाहर भानुदास माळी यांच्यात काही गैरसमज निर्माण झाल्यामुळे वादीने नि. दिवाणी दावा क्र. ८१७/२०१२, किसन वि. जवाहर, हा दाखल केला होता. त्यामध्ये त्यांचेतील गैरसमज दुर होवून सदर दावा दि. १८/११/२०१५ रोजी वादीच्या हक्कात मंजूर झाला आहे. त्यानुसार वादीच्या

नावाची नोंद जमिन गट क्र. ३१४ च्या ७/१२ पत्रकी आलेली आहे. दावा मिळकत ही मौजे मस्सा (खं), ता. कळंब येथिल ग्रामपंचायतीच्या हद्दीत येत असल्याने ग्रामपंचायतने त्यास घर क्र. ६४६ असा क्रमांक दिलेला आहे. त्याबाबत गाव नमुना आठ अ वर वादीच्या नावाची नोंद घेण्यात आलेली आहे.

४. अर्जात पुढे कथन असे की, प्रतिवादीचा दावा मिळकतीशी मालकी अथवा कब्जाशी काहीही संबंध नसताना ६ महिन्यांपासून प्रतिवादी हा दावा मिळकतीतील वादीच्या कब्जे—वहिवाटीस हरकत करित आहे. प्रतिवादीचा मंडप आकण्याचा व्यवसाय असून त्यांनी वादीची टपरी खाली पाडून इतर मोकळया जागेत मंडपाचे सामान टाकीत आहे. वादीने त्यास मज्जाव केला असता प्रतिवादीने त्याकडे संपुर्ण दुर्लक्ष केले. दि. २७/११/२०१८ रोजी प्रतिवादीने वादीच्या दावा मिळकतीत मंडपाचे साहित्य टाकण्याचा प्रयत्न केला असता वादीने त्यास हरकत घेतल्यावर प्रतिवादीने मंडपाचे साहित्य सतत टाकण्याचा आपला मनोदय वादीजवळ बोलून दाखविला. दाव्याचा अंतिम निकाल लागण्यास बराच अवधी लागणार असल्याने प्रतिवादीचे हरकतीचे कृत्य चालू राहील्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादीविरूध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी विनंती केली आहे. अर्जाच्या पुष्टयर्थ नि.क्र. ६ अन्वये प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

५. प्रतिवादीने निशाणी क्र. १५ अन्वये लेखी कैफियत व म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्जास हरकत घेतली आहे. अर्जातील कथने प्रतिवादीने नाकारली आहेत. त्यांच्यातर्फे असे कथन आहे की, दावा मिळकतीशी वादीचा काहीही संबंध नाही. प्रतिवादीचा भाऊ—चंद्रकांत जर्नादन सावंत यांनी मस्सा (खं), ता. कळंब येथिल जमिन भूमापन गट क्र. ३१४ मधील पुर्व—पश्चिम ७० फूट व दक्षिण—उत्तर ३३.५ फूट, ज्याची चतु:सिमा :— पुर्वेस — लिहून देणार म्हणजेच हौसाबाई भानुदास माळी, पश्चिमेस — सरकारी रस्ता, दक्षिणेस — ०८ फूट रस्ता व त्यानंतर शारदाबाई माळी यांची जमिन व उत्तरेस — गोरख कदम, ही मिळकत दि. ३०/०७/२००० रोजी हौसाबाई भानुदास माळी यांचेकडून कायमस्वरूपी

रक्कम रू. १०,०००/— च्या मोबदल्यात घेवून तो व्यवहार रू. २०/— च्या मुद्रांकावर नमूद केला आहे. त्यावर हौसाबाई भानुदास माळी यांची लिहून देणार म्हणून सही असून त्यांचा मुलगा जवाहर भानुदास माळी व व्यंकट मारूती काळे यांच्या साक्षीदार म्हणून सहया आहेत. त्यानंतर प्रतिवादीच्या कुटूंबात झालेल्या तोंडी वाटपामध्ये सदरील जागा ही प्रतिवादीच्या वाटयास आली. हौसाबाईने सदरील जागा चंद्रकांत यास खरेदी दिल्यापासून मालक या नात्याने त्याचा कब्जा होता. त्यानंतर सदरील जागा प्रतिवादीस वाटून मिळालेवर प्रतिवादीचा सदर जागेवर मालक म्हणून कब्जा व वहिवाट आहे. प्रतिवादीच्या नावाची नोंद ग्रामपंचायत अभिलेखामध्ये मार्च २००८ साली झाली असून त्याचा ग्रामपंचायत मिळकत क्र. ३२७ असा आहे. प्रतिवादीने सदर जागेमध्ये आर.सी.सी. बांधकाम केले असून कुटूंबियांसमवेत वास्तव्यास असून त्यावर त्याने महाराष्ट्र ग्रामीण बॅक मस्सा (खं) यांचेकडून रू. ६,००,०००/— चे कर्ज घेतलेले आहे. सदर कर्जाची नोंद मिळकत क्र. ६२७ च्या ग्रामपंचायत उता—यावर आहे.

**६.** प्रतिवादीचे पुढे असे अभिकथन आहे की, वादीने नि.दि.दा.क्र. ८१७/१२ मधील हुकूमनामा हा मे. न्यायालयाची दिशाभुल करून त्यांच्या हक्कात करून घेतला असुन त्याचा दुरूपयोग करून वादीने महसुली अभिलेखात व ग्रामपंचायत अभिलेखामध्ये त्यांच्या नावाच्या नोंदी केलेल्या आहेत. वास्तविक पाहता, सदर दाव्यातील वादीचे कथन हे निव्वळ खोटे व काल्पनिक असुन वादीचे वडील नामे— गणपती व प्रतिवादी— जवाहरचे वडील भानुदास यांच्यामध्ये मौजे मस्सा खं., ता. कळंब येथील जमीन गट क्र. ३१४ चे अनुषंगाने वाटप होवुन ० हे. ५९ आर मधील पुर्व—पश्चिम ३० फुट व दक्षिणोत्तर १६.५ फुट ही जागा त्यांच्या वडीलांना वाटुन आलेली होती व त्यानुसार त्यांच्या वडीलांचा कब्जा होता. पुढे त्यांच्या वडीलांच्या मृत्युनंतर सदरील मिळकत ही वादीस वाटुन आली असे कथन केले आहे. वास्तविक पाहता, वादीचे वडील गणपती व जवाहरचे वडील भानुदास यांच्यामध्ये कुठलाही नातेसंबंध नव्हता व नाही. त्यामुळे गणपती यांचे वडील एकनाथ यांना गणपती यांना गणपतीसह इतर ०६ भाऊ होते तर जवाहरचे

वडील भानुदास यांना समाबाई व रूक्मीणबाई अशा दोन बहीणी होत्या. त्यांचे वडील बापूराव यांचा देखील एकनाथ अथवा गणपती यांच्याशी कांहीही नातेसंबंध नव्हता व नाही. असे असताना केवळ कायदेशिर बाबीचा दुरूपायोग करून वादीने मे. न्यायालयात रे.दि.दा.क्र. ८१७/१२ दाखल केला व जवाहर भानुदास माळी यांच्याशी संगनमत करून खोटा हुकूमनामा तयार केला व त्या आधारे महसुली अभिलेखात व ग्रामपंचायत अभिलेखात स्वत:च्या नावाच्या नोंद घेतल्या आहेत.

७. प्रतिवादीने पुढे असे कथन केले की, मौजे मस्सा (खं.), ता. कळंब येथील जीन गट क्र. ३१४ क्षेत्र ० हे. ५९ आर चे अनुषंगाने महसुली अभिलेखामध्ये जवाहर भानुदास माळी व भारत भानुदास माळी यांच्या संयुक्त नोंदी असताना वादीने केवळ जवाहर भानुदास माळी यांच्याविरूध्द रे.दि.दा.क्र. ८१७/१२ दाखल केला होता. त्याच सोबत सदरील दाव्यामध्ये प्रस्तुत प्रतिवादी हा पक्षकार देखील नव्हता. त्यामुळे सदरील दाव्यातील हुकूमनामा प्रस्तुत प्रतिवादीवर बंधनकारक नाही. तसेच प्रस्तुत दाव्यात देखील जवाहर भानुदास माळी हा आवश्यक पक्षकार आहे. परंतु, वादीने जवाहर माळी यास प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी म्हणुन समाविष्ठ न केल्यामुळे प्रस्तुत दाव्यास आवश्यक पक्षकार न करणे, या तत्वाची बाधा निर्माण झालेली असल्याने प्रस्तुत दावा खर्चासह खारीज होणे न्याय व जरूरी आहे.

८. प्रतिवादीने पुढे असे कथन केले की, प्रतिवादी हा व्यवसायाने शेतकरी असुन शेतीसह मंडप टाकण्याचा व्यवसाय फार पुर्वीपासुन करत असुन त्याकामी लागणारे साहीत्य प्रतिवादी त्यांच्या ग्रामपंचायत मिळकत क्र. ६२७ मध्ये ठेवत आहे. ही बाब वादीला माहीत आहे. उलटपक्षी वादीचा ग्रामपंचायत मिळकत क्र. ६२७ शी कांही एक संबंध नाही. परंतु, रे.दि.दा.क्र. ८१७/२०१२ च्या हुकूमनाम्याआधारे तयार केलेल्या बनावट व बोगस नोंदीच्या आधारे प्रतिवादीची मिळकत गिळंकृत करण्याच्या दुष्ट हेतुने वादीने वादोत्पत्तीचे खोटे कारण व खोटी तारीख नमुद करून प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. वादीने रे.दि.दा.क्र. ८१७/२०१२ मध्ये ज्या चतु:सिमा नमुद केल्या आहेत, त्या चतु:सिमा या प्रतिवादीच्या मिळकत क्र. ६२७ या मिळकतीस मिळत्या जुळत्या आहेत. वास्तविक पाहता, वादीने प्रस्तुत दाव्यात

दाखल केलेली ग्रामपंचवायत घर मिळकत क्र. ६४६ ही दाव्यात नमुद केलेल्या वर्णनाप्रमाणे अस्तित्वातच नाही. परंतु, रे.दि.दा.क्र. ८१७/२०१२ चा कायदेशिर मार्गाने दुरूपयोग करून वादीने ६४६ ही मिळकत केवळ कागदोपत्री निर्माण केली व त्याचा दुरूपयोग करून प्रतिवादीची मिळकत गिळंकृत करण्याचा वादी प्रयत्न करीत आहे. वादीचा अर्ज मंजुर केला तर त्याचा गैरफायदा घेवुन वादी प्रतिवादीस त्याच्या राहत्या घरातुन बेदखल करण्याचा प्रयत्न करेन, त्यामुळे दावा व प्रस्तुत अर्ज खर्चासह खारीज होणे न्याय व जरूरीचे आहे. सबब, अर्ज नामंजूर होण्यास विनंती केली आहे.

**९.** वादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे युक्तिवादासाठी कोणीही हजर न झाल्याने त्यांचे युक्तिवादाशिवाय अर्जाचे कामकाज चालविण्यात आले.

**१०.** अभिलेखाचे अवलोकन केले. खालील मुद्दे मी विचाराधीन घेतले, त्यांचे सबळ कारणांसहित निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे:

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादीला सकृतदर्शनी केस आहे काय? | **..होय** |
| २) | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | **..होय** |
| ३) | तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | **..होय** |
| ४) | आदेश काय? | **.. अर्ज मंजुर करण्यात येतो.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**११. अ) <u>वादीतर्फे खालील कागदपत्रांचा संदर्भ दिला आहे</u> :—**

१) मौजे मस्सा (खं), ता. कळंब येथिल ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामपंचायत घर क्र. ६४६ चा ८ अ उतारा, नि.क्र. ७ वर,

२) मौजे मस्सा (खं), ता. कळंब येथिल गट क्र. ३१४ चा ७/१२ उतारा, नि.क्र. ८ वर,

३) साक्षीदार अनंत माळी यांचे शपथपत्र, नि.क्र. २० वर,

**ब)** **<u>प्रतिवादीने खालील कागदपत्रांचा संदर्भ दिला आहे</u> :—**
प्रतिवादीने कोणतेही कागदपत्रे दिलेली नाहीत.

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता</u> :—**

**१२.** सदरील मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. एखादया मिळकतीतील ताब्याच्या अनुषंगाने तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी मंजूर करत असताना, त्या पक्षकारास सकृतदर्शनी केस आहे का, न्यायाचा समतोल त्याच्यावतीने आहे का, आणि तात्पुरत्या मनाईचा हुकुमाची मागणी नामंजूर केल्यास विरुध्द पक्षकारापेक्षा त्या पक्षकाराचे अतोनात असे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय किंवा कसे, इत्यादी मुद्दे गुणवत्तेवर ठरविणे ही गरजेची बाब असते. सबब, प्रस्तुतचा अर्ज निकाली काढत असताना सकृतदर्शनी वादीच्या कथनात तथ्य आहे का व अर्ज मंजूर केल्यास कोणाचे जास्त नुकसान होईल, हे पाहणे न्यायोचित आहे.

**१३.** वादीच्या अभिकथनांनुसार वादीच्या वाटणीस येवून गेल्या २१ वर्षापासून वादीचा त्यावर ताबा आहे. सदर दावा मिळकतीबाबत वादी व वादीचा चुलत भाऊ जवाहर भानुदास माळी यांच्यात काही गैरसमज निर्माण झाल्यामुळे वादीने नि. दिवाणी दावा क्र. ८१७/२०१२, किसन वि. जवाहर, हा दाखल केला होता. त्यामध्ये त्यांचेतील गैरसमज दुर होवून सदर दावा दि. १८/११/२०१५ रोजी वादीच्या हक्कात मंजूर झाला आहे. त्यानुसार वादीच्या नावाची नोंद जमिन गट क्र. ३१४ च्या ७/१२ पत्रकी आलेली आहे. वादीतर्फे दाखल निशाणी क्र. ०७ वरील मिळकत क्र. ६४६ चा सन २०१६—१७ चा गाव नमुना आठ अ चा उतारा पाहिला असता त्यावर दावा मिळकतीचे वर्णन नमूद असून मालकाचे नाव या रकान्यात वादीच्या नावाची नोंद दिसून येते. महसुली खात्यात असलेल्या नोंदीमुळे एखाद्या व्यक्तीचा मालकीहक्क सिध्द होत नसला तरीही सदरच्या नोंदी जो पर्यंत चुकीच्या आहेत असे सिध्द होत नाही, तो पर्यंत त्या योग्य व बरोबर असल्याचे गृहितक आहे. दावा मिळकतीच्या ८—अ उता—यावर वादीच्या नावाची नोंद असल्याचे

कागदपत्रांवरून दिसुन येते. सदरची नोंद वादीने नि.दि.दा.क्र. ८१७/२०१२ मधील हुकमनाम्याचा दुरूपयोग करून, करून घेतल्याचे प्रतिवादीचे म्हणणे असले तरीही त्याविषयी कोणताही सकृतदर्शनी पुरावा प्रतिवादीने सादर केलेला नाही अथवा महसुली खात्यात वादीच्या नावाची दावा मिळकतीवर असलेली नोंद चुकीची आहे हे सकृतदर्शनी सिध्द केलेले नाही.

**१४.** प्रतिवादीच्या अभिकथनानुसार वादीने नि. दि. दावा क्र. ८१७/२०१२ मधील हुकूमनामा मे. न्यायालयाची दिशाभूल करून घेवून त्याचा दुरूपयोग करून ग्रामपंचायत अभिलेखावर व महसुली खात्यात वादीच्या नावाची नोंद करून घेतली आहे. त्याविरूध्द् प्रतिवादीने वादीविरूध्द् योग्य ती कायदेशिर कारवाई केली होती का व नाही केली तर त्याबाबतचा खुलासा इत्यादी काहीही स्पष्ट केलेले नाही. वादीतर्फे दाखल साक्षीदार— अनंत प्रल्हादराव माळी यांचे शपथपत्र पाहिले असता सदर साक्षीदाराने दावा मिळकतीवर गेल्या २१ वर्षापासून वादीचा कब्जा असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादीने आपल्या कथनांच्या पृष्टयर्थ कोणतीही कागदपत्रे अथवा तोंडी पुरावा दाखल केला नाही. सबब, प्रतिवादीचे अभिकथन सकृतदर्शनी सिध्द् झालेले नाही.

**१५.** अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली असता दावा मिळकतीवर वादीचा ताबा असल्याचे सकृतदर्शनी सिध्द् होते. वादीने कथन केल्यानुसार प्रतिवादीने दि. २७/११/२०१८ रोजी दावा मिळकतीवर मंडपाचे साहित्य टाकून वादीच्या कब्जे—वहिवाटीस अडथळा निर्माण केला. सदरची बाब प्रतिवादीने नाकारली असली तरीही सदरचे कथन सकृतदर्शनी खोडून काढलेले नाही. सबब, वादीच्या हक्कात सुविधेचा समतोल दिसून येतो. अर्ज नामंजूर केल्यास वादीच्या मालकी हक्कावर गदा निर्माण होईल. याउलट अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे अपरिमित नुकसान होईल, असे दिसून येत नाही. कारण, दावा मिळकतीवर वादीचा मालकी हक्काने कब्जा असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मुदद्ा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदविले आहेत.

**मुद्दा क्र.४ करीता :—**

**१६.** वरील सर्व विवेचनावरून व मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्षांवरून मुददा क्र.४ करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे :—

**आदेश**

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादीने मौजे मस्सा (खं), ता. कळंब येथिल ग्रामपंचायत हदद्ीतील ग्रामपंचायत घर क्र. ६४६, पुर्व—पश्चिम : ३० फूट व दक्षिण—उत्तर : १६ १/२ फूट, ज्याची चतु:सिमा :— पुर्वेस — जवाहर भानुदास माळी यांची जागा, पश्चिमेस — बार्शी—कळंब जाणारा रस्ता, दक्षिणेस — शारदाबाई माळी यांची जागा व उत्तरेस — जवाहर भानुदास माळी यांची जागा यातील घरजागेच्या वादीच्या मालकीने असलेल्या कब्जेवहिवाटीस अडथळा करू नये, असा दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत तात्पुरता मनाई हुकूम याद्वारे पारित करण्यात येत आहे.

३) खर्चाबद्दल कोणतेही आदेश नाहीत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Rohini Rajendra Kulkarni
Date: 2019.12.31 17:11:14 +0530

( श्रीमती आर.आर.कुलकर्णी )

दिनांक— ०७/१२/२०१९. २रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, कळंब.